Exh. 10/C

स. क्रि. केस नं. 170 /२०२६

# मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, कागल

## यांचे कोर्टात

श्री. नामदेव आनंदराव पाटील ------ फिर्यादी

विरूध्द

श्री. सचिन मनोहर चव्हाण ------ आरोपी

## व्हेरीफिकेशन

मी श्री. नामदेव आनंदराव पाटील व.व. ५५, व्यवसाय– वैदकीय व्यवसाय, रा. वरदान हॉस्पिटल, नदी किनारा सिध्दनेर्ली, ता. कागल, जि. कोल्हापूर देवाशपथ खरे सांगतो की,

Order R & R JMFC, Kagal

१) मी व्यवसायाने डॉक्टर असून माझे वरदान हॉस्पिटल या नावाने नदीकिनारा सिध्दनेर्ली, ता. कागल, जि. कोल्हापूर येथे हॉस्पिटल असून मी तेथील कायमचा रहिवाशी आहे. माझे व आरोपीचे पाच वर्षापासून मित्र असून मी आरोपीला चांगल्या प्रकारे ओळखतो. मैत्रीच्या संबंधामुळे माझे व आरोपीचे एकमेकांच्या घरी जाणे येणे असते. आरोपीचा रियल इस्टेट खरेदी विक्री व्यवसाय आहे. या व्यवसायासाठी मी वेळोवेळी मैत्री खातर पैशाची मदत केलेली आहे. त्याप्रमाणे व्यवसायासाठी व प्रापंचिक अडचणीसाठी रक्कमेची आवश्यकता आहे असे मला सांगितले. त्यानंतर मी आरोपीस दि. १२/०१/२०२४ इ.रोजी आरोपीची अडचणी दुर करणेकरिता रोख रक्कम रू. ११,००,०००/– (अक्षरी रक्कम

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal
13/03/2026

रू. अकरा लाख फक्त) रोख दिले. मैत्रीचे संबंध असल्यामुळे रक्कम पोहाचलेबाबत वेगळी पोहोच पावती घेण्यात आलेली नाही.

२) सदर रक्कम देत असलेवेळी डॉ. मुकुंद बाळासाहेब चौगले रा. दारवाड, जि. कोल्हापूर व रोहित जयसिंग कुंभार रा. खुपीरे, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांचेसमोर साक्षीने रोख रक्कम रू. ११,००,०००/— (अक्षरी रक्कम रू. अकरा लाख फक्त) अदा केलेली आहे.

३) माझेकडून स्विकारलेली रक्कम आरोपी यांनी दोन महिन्याच्या आत देणेची अटीवर देण्यात आलेली असे आरोपीकडून कबुल करून तोंडी हमी घेवून दिलेली आहे. तसेच मला वरील दोन महिने मुदतीत रक्कम विनातक्रार उपलब्ध होणार असलेली खात्री दिलेनंतर सदरची रक्कम अदा केलेली आहे.

३) दोन महिन्यानंतर मी आरोपीकडे सदर रक्कम मागणी केली असता आरोपी माझेकडून हातउसने आर्थिक अडचण व व्यवसायासाठी घेतलेली रक्कम आज देतो, उदया देतो, आठ दिवसांनी देतो अशी चालढकल केली अशी चालढकल आरोपीकडून जवळपास अकरा महिने इतके झालेली आहे. मी खूपच तगादा लावला असता माझेकडून हातउसने घेतलेल्या रक्कमेच्या कायदेशीर परतफेडीसाठी मला आरोपी यांनी आरोपीचे खाते असले बॅंकेचा पहिला चेक बॅंक ऑफ इंडिया, चेक नं. १३००४३ शाखा गारगोटी या बॅंकेचा रक्कम रू. ६,००,०००/—

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

(अक्षरी सहा लाख फक्त) व दुसरा चेक नं. १३००४० या बॅंकेचा रक्कम रू. ५,००,०००/— (अक्षरी पाच लाख फक्त) इतक्या रक्कमेचे चेकवरील रक्कम लिहून दिली व त्यानंतर सदर दोन्ही चेकवरील नांव लिहिणेस मला सांगितले व सदर चेकवरील मजकुराची शहानिशा करून सदर चेकवर आरोपी यांनी मी व डॉ. मुकूंद बाळासाहेब चौगले व रोहित जयसिंग कुंभार यांचे समक्ष सही करून दिला व सदर चेक वटून मला मी दिलेली कायदेशीर रक्कम परत मिळणार यांची खात्री व हमी दिली. सदर चेक नमुद तारखेवर बॅंकेत जमा करणे विषयी विनंती केली.

४) मी आरोपी यांच्या विनंतीनुसार चेक वटणेकरिता माझे खाते असलेल्या सदरचे दोन्ही चेक हे श्री वीरशैव बॅंक शाखा— कागल जि. कोल्हापूर या बॅंकेत दि. ०६/०१/२०२६ इ.रोजी भरले असता सदरचे दोन्ही चेक ''फंड्स इनसफिशिएंट' या शे—यासहीत न वटता दि. ०६/०१/२०२६ इ.रोजी परत आले.

५) त्यानंतर मी आरोपी यांना दिनांक २८/०१/२०२६ इ. रोजी माझे वकील ॲड. जान्हवी नामदेव पाटील यांचेकरवी लेखी नोटीस रजिस्टर्ड पोस्टाने त्यांचे पत्यावर पाठवून सदरचे चेक न वटलेबाबत कळवून आरोपी यांचेकडून नोटीस मिळालेपासून १५ दिवसांचे आत सदर न वटलेल्या चेकच्या रक्कमेची मागणी केली.

६) सदरची नोटीस आरोपी यांचे अचुक पत्यावरती गेली असता सदरची नोटीस ही दि.३०/०१/२०२६ इ.रोजी स्विकारली असून

Cundale 13/3/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

4

तशी पोहोच पावती माझे वकीलांचेकडे परत आली आहे. सबब, कायदयाच्या प्रस्थापित तत्वानुसार सदरची नोटीस आरोपी यास दि. ३०/०१/२०२६ इ. रोजी लागू झाली.

७) तथापि, आरोपी यांनी त्यानंतर म्हणजेच त्यांना नोटीस मिळालेपासून १५ (पंधरा) दिवसांत म्हणजेच दिनांक १४/०२/२०२६ इ. रोजीपर्यंत अथवा त्यानंतर आजतागायत आरोपी यांनी मला सदरच्या धनादेशाची रक्कम आदा केलेली नाही. अशारितीने आरोपी यांनी माझे कायदेशिर देणे मला आदा करणेकरीता दिलेले चेक न वटता परत आलेनंतर सदरच्या चेक रक्कमेची मागणी करणारी नोटीस मिळून देखिल त्यानंतर १५ दिवसांत मला सदरच्या चेकची रक्कम आदा केली नाही. यावरुन आरोपीने दि निगोशिएबल इन्स्टुमेंट ॲक्ट कलम १३८ प्रमाणे गुन्हयाचे कृत्य केले आहे.

सबब, माझी विनंती अशी की,

अ. आरोपीने माझे कायदेशीर देणे लागत असतानाही आपल्या खात्यावर चेकच्या रक्कमेएवढी रक्कम शिल्लक नाही याची पुर्ण कल्पना असतानाही चेक नक्की वटेल याची खोटी हमी व खात्री मला देवून आरोपीने माझी जाणुन बुजून, हेतुपुरस्पर घोर फसवणुक करून गंभीर स्वरूपाचा फौजदारी गुन्हा केलेला आहे, त्यामुळे आरोपीस दि निगो.इ. ॲक्ट कलम १३८ अन्वये जास्तीत जास्त कडक शिक्षा व्हावी.

13/03/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

ब) सदर आरोपीस चेकचे दुप्पट रक्कमेचा दंड करण्यात येवून सदरची रक्कम नुकसानी दाखल भारतीय नागरीक सुरक्षा संहीता २०२३ चे कलम ३९५ (३)व नि. इ. ॲक्ट १८८१ चे कलम ११७ (क) अन्वये मला देवविण्यात यावी.

म्हणून केले व्हेरिफिकेशन आज मुक्काम कागल

दि. १३/०३/२०२६

ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो.

ॲफिडेव्हीट करणार

नामदेव आनंदराव पाटील

(ॲड. जान्हवी एन. पाटील)

## प्रतिज्ञा

मी श्री. नामदेव आनंदराव पाटील व.व. ५५, व्यवसाय– वैदकीय व्यवसाय, रा. वरदान हॉस्पिटल, नदी किनारा सिध्दनेर्ली, ता. कागल, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञा करतो की, वर नमुद व्हेरीफिकेशन मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा

कागल

ता. 13/०3/२०२६

प्रतिज्ञा करणार

नामदेव आनंदराव पाटील

Solemnly Affirmed before me by Shri नामदेव आनंदराव पाटील
व.व. ५५ रा. सिध्दनेर्ली ता. कागल
identified by Shri वकील J N Patil
whom I know personally.
Dated 13/03/2026

Assistant Superintendent

Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.05.15 17:56:09 +0530